**मे. आयान मल्टीट्रेड एल.एल.पी. (युनिट-१), गाव-समशेरपूर, तालुका, जिल्हा-नंदुरबार, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात ऊस गाळप क्षमता विस्तारिकरण १०,०००.० टन प्रतिदिन वरुन १५,०००.० टन प्रतिदिन (५,०००.० टन प्रतिदिन वाढ) करणे, कार्यरत मोलॅसिस आधारित आसवणी प्रकल्पात सिरप "बी"/"सी" हेवी मोलॅसिस वापरुन १००.० किलोलीटर प्रतिदिन वरुन ७००.० किलोलीटर प्रतिदिन विस्तारिकरण (६००.० किलोलीटर प्रतिदिन वाढ) करणे, तसेच कार्यरत सहवीज उत्पादन प्रकल्प ३५.० मेगावॅटवरुन ८४.० मेगावॅट (४९.० मेगावॅट वाढ) विस्तारिकरण संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

---

मे. आयान मल्टीट्रेड एल.एल.पी. (युनिट-१), सर्व्हे नं. सर्व्हे.नं. १०५,१०६,१०७/१, १०७ / २, १०८, १०९, ११०, १११, ११२, ११३, २३४, २३५/१, २३५/२, २३६/१, २३६/२, २३६/३, २३६/४,२३७,२३८,२३९/१/ए,२३९/१/बी,२३९/२,गाव-कोरीट आणि सर्व्हे नं. २३९, २४०/१/ए, २४०/१/बी, २४०/१/सी/२,गाव-समशेरपूर, तालुका, जिल्हा-नंदुरबार -४२५ ४१२, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात ऊस गाळप क्षमता विस्तारिकरण १०,०००.० टन प्रतिदिन वरुन १५,०००.० टन प्रतिदिन (५,०००.० टन प्रतिदिन वाढ) करणे, कार्यरत मोलॅसिस आधारित आसवणी प्रकल्पात सिरप "बी"/"सी" हेवी मोलॅसिस वापरुन १००.० किलोलीटर प्रतिदिन वरुन ७००.० किलोलीटर प्रतिदिन विस्तारिकरण (६००.० किलोलीटर प्रतिदिन वाढ) करणे, तसेच कार्यरत सहवीज उत्पादन प्रकल्प ३५.० मेगावॅटवरुन ८४.० मेगावॅट (४९.० मेगावॅट वाढ) विस्तारिकरण संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपर जिल्हादंडाधिकारी, नंदूरबार, यांचे अध्यक्षतेखाली दि. १४ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १२.०० वा. घेण्यात आली.

१ मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपर जिल्हादंडाधिकारी, नंदूरबार - **अध्यक्ष**

२ प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक - **सदस्य**

३ उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, धुळे - **समन्वयक**

श्री. प्रणव पाखले, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ धुळे तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली.

भारत सरकार, पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांची अधिसुचना क्रं. एस.ओ.१५३३ दि. १४/०९/२००६ (दि. ०१/१२/२००९ सुधारित) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका टिप्पणी आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले आहे.

पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाला होता. सदर जाहीर लोकसुनावणी बाबतची जाहीर सुचना दि. ११/१२/२०२४ रोजी दै. लोकमत (मराठी) व दी टाईम्स ऑफ इंडीया (इंग्रजी) या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली होती. सदर परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, विस्तापित होणारे किंवा अन्य प्रकारे

प्रभावित होणारे रहिवाशी यांना सुचना, टिका टिप्पणी लेखी स्वरुपात ३० दिवसांपर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, धुळे येथे पाठविण्याचे नमुद करण्यात आले आहे.

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्तऐवज (मराठी व इंग्रजी) मध्ये खालील कार्यालयामध्ये उपलब्ध करुन देण्यात आले होते.

- जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार
- जिल्हा उदयोग केंद्र, नंदुरबार
- जिल्हा परिषद, नंदुरबार
- उपविभागीय कार्यालय, नंदुरबार
- तहसिल कार्यालय, नंदुरबार
- ग्रामपंचायत कार्यालय, समशेरपूर, शिंदे, कोरिट व बामडोद ता. जि. नंदुरबार
- उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, धुळे.
- प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, नाशिक
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,(मुख्यालय), मुंबई
- पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
- प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पुर्व विंग, नवीन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर

उप-प्रादेशिक अधिकारी तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी नमुद केले की, सदर प्रकल्पा बाबत अदयाप पावेतो उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ धुळे यांचेकडे कुठलेही आक्षेप, टिका टिप्पणी लेखी स्वरुपात प्राप्त झालेला नाही. कोणास कांही लेखी / तोंडी आक्षेप नोंदवायचे असतील तर ते सदर सुनावणी दरम्यान नोंदवू शकतात.

समन्वयक यांनी अध्यक्ष, जाहीर लोक सुनावणी समिती यांना सदर प्रकल्प धारकांस / त्यांचे प्रतिनिधीस सादरीकरण करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी यांनी प्रकल्पाचे प्रतिनिधी यांना प्रकल्पाबददल सादरीकरण करण्याचे आदेशित केले.

प्रकल्पाचे प्रतिनिधी व, एलिमेन्ट कन्सल्टन्सी सर्विसेस, पुणे यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले. जसे की पर्यावरण प्रभाव मुल्यांकन आणि जाहीर जनसुनावणीचे प्रयोजन, प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदयस्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी.
प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी नियोजित प्रकल्पाविषयी केलेल्या सादरीकरणा नंतर नागरिकांनी मांडलेल्या सूचना / आक्षेप इत्यादींचा वृत्तांत खालीलप्रमाणे.

सादरीकरण पुर्ण झाल्यानंतर समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी ,पर्यावरणविषयक सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले नांव, गावाचे नांव सांगण्यात यावे.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **श्री उमाकांत माधव पाटील, उपसरपंच,शिंदे ग्रामपंचायत, तालुका व जिल्हा-नंदुरबार:-**

आमचे गाव या कारखान्याच्या पूर्वेस, पश्चिमेस अंदाजे एक किलोमीटर अंतरावर आहे. या रस्त्याला लागून आमचे शेतशिवार चालू होता. २०२२ पासून या कारखान्याच्या चिमणीतून एवढी काळी राख उडते की ती पाण्यावर,अन्नावर, पीकांवर दैनंदिन व्यवहार करताना मनुष्याच्या अंगावर प्राण्यांच्या चा-यावर पडलेली असते. त्याविषयी वेळोवेळी निवदने ही कारखान्यास, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, धुळे यांना दिलेली आहेत. आमचा आक्षेप आहे की ज्यांची तक्रार होती, त्या गावांना, तक्रारदारांना शासकीय अधिकारी आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, धुळे कार्यालयाने भेटी देऊन पाहणी केलेली नाही. आता जरी सादरीकरणात झाडांची माहिती, चिमणीची उंची दर्शविलेली असली, तरीही आमच्या गावांची सद्यस्थिती डोळ्याने बघा. आपण फक्त १५ फुट चाला. कुठल्याही धार्मिक स्थळावर चला, रानात, गावात चाला, तेथे तुम्हांला आमच्या गावाची सद्य परिस्थिती दिसेल.

पुढील आक्षेप आहे की प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पासाठी पर्यावरण सर्वेक्षणाचा कालावधी हा मार्च महिन्यात निवडला. तर राखेचा प्रश्न हा गळीत हंगामापासून चालू होतो. गळीत हंगाम संपला की तो मिटतो. तरी जिल्हाधिकारी यांना नम्र विनंती आहे की आपण प्रत्यक्ष भेट द्यावी, तसेच २०२२ पासून आमची निवेदने ही जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार कार्यालयात, धुळे येथील महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दिलेली आहेत, ते सर्व आणि आमच्या गावाचा तक्रारी अर्ज आम्ही परत सादर करत आहोत. जोपर्यंत या प्रकल्पातून काळी राख/काजळी बाहेर पडणार नाही, तोपर्यंत या विस्तारिकरण प्रकल्पास मंजूरी देण्यात येऊ नये.

प्रकल्प अधिका-यांना तक्रार केल्यास ते स्थानिक ग्रामस्थांना जी माहिती देतात, ती ग्रामस्थांना कळत नाही. स्थानिकांचा प्रकल्पास विरोध नाही, फक्त प्रकल्प व्यवस्थापनाने राखेचे वातावरणातील उत्सर्जन १००% संपुर्ण नियंत्रणात आणलेच पाहिजे व जिल्हाधिकारी, नंदुरबार यांनी बाधित गावांना भेट दिल्याच पाहिजे ही आमची मागणी आहे. दर हंगामात प्रकल्प प्रवर्तकांकडून राख सोडली जाते. तरी आमच्या गावाला, बाधित लोकांना भेट द्यावी.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री उमाकांत पाटील, उपसरपंच, शिंदे ग्रामपंचायत यांना निवेदन सादर करण्याची सूचना केली.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर देताना माहिती दिली की प्रकल्पात कार्यरत बॉयलर्सना लावलेल्या चिमण्या (stack) या पारित निर्देशांनुसारच उंचीच्या आहेत. ज्यावेळी पर्यावरण सल्लागार संघाने हवेच्या प्रदूषणाचे सर्वेक्षण केले, त्यावेळी निदर्शनास आले की राखेचे उत्सर्जन हे होत आहे. तरी त्यासाठी प्रकल्पात अत्यंत आधुनिक हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्र ईएसपी – इलेक्ट्रो-स्टॅटिक-प्रेसिपरेटर हे कार्यान्वित करण्यात येणार आहेत. त्याची कार्यक्षमता ही ९९.९% एवढी असते. भविष्यात प्रकल्पात कोळसा वापरण्यात येणार नाही. त्यामुळे राखेचा-काजळीचा त्रास स्थानिकांना होणार नाही. तसेच सादरीकरणात पर्यावरण व्यवस्थापन योजना ही आपणास जो त्रास होते, ते पुर्णपणे कमी कसा होईल याचा विचार करुन नियोजन करण्यात आलेले आहेत.

त्यावेळी उपस्थित स्थानिकांनी एकत्रितपणे कंपनीपासून होणा-या त्रासाबाबत आक्षेप नोंदविण्यास सुरवात केली.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की पर्यावरण सल्लागार यांनी राखेचा मुद्दा सादरीकरणात उपस्थित केलेला आहे. याबाबत स्थानिकांनी कारखाना प्रशासनाबरोबर चर्चा केलेली आहे. आपण जो पूर्वी प्रकल्प केला, तो कोविड काळातील होता. आपण जो ईएसपी स्थापित केला, त्यात बदल करुन जवळजवळ १०४.० कोटी ईएसपीसाठी कारखाना खर्च करणार आहे. नविन ईएसपी ही अधिक कार्यक्षमतेचा राहिल. त्या नविन ईएसपीतून पडणा-या राखेतून कुठलाही दुष्परिणाम परिसरात होणार नाही.

त्यावेळी स्थानिक उपस्थितांनी एकत्रितपणे गावांतील पाण्याच्या प्रदूषणाचा मुद्दा उपस्थित करण्यास सुरवात केली. येथे प्रकल्प प्रवर्तक यांनी स्पष्टीकरण देताना सांगितले की २०१८-२०१९ मध्ये कारखान्यातून काही मोलॅसिस वाहुन गेले होते. त्यामुळे कारखान्यास दंड करण्यात आला, तो कारखान्याने भरलेला आहे. त्यावेळी झालेले प्रदूषण आजही थोड्या प्रमाणात पाझरत असण्याची शक्यता आहे. प्रकल्पातून कुठल्याही प्रकारे दुषित सांडपाणी प्रकल्पाबाहेर सोडण्यात येत नाही. कारख्यातून प्रक्रिया केलेले सांडपाणी हे ऊसाला वापरले जाते. स्थानिकांना केलेली सूचना योग्य असल्यास त्याची त्वरित अंमलबजावणी करण्यात येते. पाण्याचे नियोजन दिवसेंदिवस करण्यात येते आहे. यावेळी भरपूर प्रमाणात पाऊस झालेला असल्याने सांडपाण्याचे प्रमाणही वाढलेले आहे.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की सदरहू जनसुनावणी ही प्रस्तावित प्रकल्पाविषयी स्थानिकांचे ज्या सूचना, आक्षेप आहेत, त्यांची नोंद घेण्यासाठी आहे. आपण जे मुद्दे उपस्थित करत आहेत, त्याचे रेकॉर्डिंग करण्यात येत आहे. त्याची नोंद बैठकीच्या इतिवृत्तात घेण्यात येणार आहे. ते इतिवृत्त केंद्र सरकारला सादर करण्यात येणार आहे. तेथील तज्ञ समिती ही प्रकल्पाबाबत निर्णय घेते. तरी उपस्थितांनी शांततेने आपल्या सूचना, विचार, आक्षेप नोंदवावेत.

२) <u>श्री नरोत्तम गोबिंद पाटील, राहणार-समशेरपूर, तालुका व जिल्हा-नंदुरबार:-</u>

२०२२ साली येथे अशीच जनसुनावणी झालेली होती. त्यावेळी साखर आयुक्त आलेले होते. या कारखान्याच्या ईशान्य दिशेला माझी ३० एकर जमिन आहे. आमच्या विहिरीचे, बोअरचे पाणी संपूर्णपणे प्रदूषित झालेले आहे. ते पाणी मी बाटलीत भरुन आणलेले आहे. कारखान्यातून पडणा-या राखेमुळे पीकांचे म्हणचे गहू, हरभरे, कापूस यांच्यावर १- १.५ सेन्टीमीटर काजळी पडते. त्यामुळे पीकांचा नायनाट होत आहे. पाण्यापासून आम्ही वंचित झालेलो आहोत. तरी जोपर्यंत हे सर्व प्रश्न सुटत नाही, तोपर्यंत विस्तारिकरणास परवानगी देण्यात येऊ नये अशी आमची कळकळीची विनंती आहे.

३) <u>श्री अनिल भाईदास भील, मुक्काम पोस्ट-शिंदे गाव, तालुका व जिल्हा-नंदुरबार:-</u>

मी सामान्य माणूस आहे. कंपनीच्या राखेमुळे स्थानिक शेतक-यांचा कापूस हा काळपट होतो आणि तो कमी भावानेच विकला जातो. मी सर्वसामान्य व्यक्ती आहे. माझ्या घरात भाकरीच्या टोपल्यातसुध्दा राख दिसते. भांडवलदार त्याचा फायदा घेत आहेत, पण परिसरातील माझ्यासारख्या सामान्य माणसाचे आरोग्य धोक्यात आहे. मी जेव्हा रस्त्याने नोकरीस जातो, त्यावेळी मी स्वत: पाहिलेले आहे की डोळ्यात राख गेल्याने दुचाकी अपघात झालेले आहेत. मीही दुचाकीवरुन जात असताना डोळ्यात राख गेल्याने अपघात झाल्याने मरता मरता वाचलेलो आहे. आता या जनसुनावणीत असे सांगण्यात आले की उप प्रादेशिक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, धुळे यांना प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पासाठी सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले असता एकही सूचना, आक्षेप लेखीस्वरुपात प्राप्त झालेली नाही असे सांगितले. तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रकल्प बाधित गावांना भेटी देऊन तक्रारदारांशी संवाद करावा,तरच स्थानिक जनता प्रदूषणाचा त्रास सांगतील. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून गावातील सर्वेक्षण करण्यात यावे. तसेच सर्व ग्रामस्थांना या बैठकीची सूचना कळविलेली नाही. आम्ही स्थानिक जेव्हा कारखाना व्यवस्थापनास तक्रार करण्यास जातो, त्यावेळी ते सांगतात की मशिनरी ही बंगळूरहून येत आहे. दोन-चार

दिवसात मशिन्स चालू झाली की राख बाहेर पडणार नाही. मात्र आजपर्यंत काहीही झालेले नाही. आपण या बैठकीचा अहवाल केंद्र शासनास पाठविणार व नंतर मंजूरी मिळणार, मग आमचा त्रास कोण ऐकून घेणार?

आम्ही प्रकल्पाच्या विरोधात नाही. तर पर्यावरण व्यवस्थापन योजना जी राबविणार आहात, ती १००% राबवावी, राखेचे उत्सर्जन हे १००% थांबविले पाहिजे. तरच मी व माझे शेतकरीबंधू त्यास सहकार्य करतील. तसेच येथे प्रदूषणामुळे काही घटना घडल्यास त्यास कारखाना प्रशासन जबाबदार राहिल. आम्हाला जाणीव आहे की येथे स्थानिक शेतक-याचा ऊस साखर कारखान्यात विकला जातो. आमच्या गावातील दोन व्यक्तींना येथे रोजगाराची संधि मिळालेली आहे.

तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने, तसेच जिल्हा प्रशासनाच्या अधिका-यांनी गावात येऊन पाहणी करावी.

तसेच माझे पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस निवेदन आहे की कारखान्यात ऊस देण्यासाठी येणारे ट्रॅक्टर येतात, ते मोठ्याने टेप लाऊन गाणी ऐकत येत असतात. त्यामुळे अपघात होण्याची जास्त भिती आहे. मी मरता मरता वाचलेलो आहे. तरी तेथे गतिरोधक लावण्यात यावेत. तसेच ट्रॅक्टर मालकांना ट्रॅक्टर चालकांना दारू न पिण्याच्या, ट्रॅक्टर हळू चालविण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

**४) श्री चंद्रकांत उध्दव चौधरी, राहणार-समशेरपूर, तालुका व जिल्हा-नंदुरबारः-**

येथे बैठकीत जनभावना काय आहे हे दिसत आहे. प्रदुषणाचा त्रास हा सर्वांनाच म्हणजे समशेरपूर, कोळदा, कोरीट असेल,या परिसरातील सर्व गावांना होत आहे. तर येथे समशेरपूरबाबत विचार केल्यास या कारखान्याच्या भिंतीच्यापलिकडेच या कारखान्याचे सांडपाणी हे आतासुध्दा बाहेर पडत आहे. मला असे समजेल की कारखाना कंपाऊंडच्या बाजूस एक हायस्कूल आहे. त्यांनीही लेखी तक्रार सादर केलेली आहे. तेथील विध्यार्थी आजाराने ग्रस्त होतात, कारण पाणी प्रदूषित झालेले आहे.

टी.व्हीवरिल नुकत्याच आलेल्या बातमीनुसार बुलढाणा जिल्ह्यात काही गावांमधील माणसांचे – ते स्त्री वा पुरुष असो, सगळे केस गळायला लागतात. चेन्नई येथील तज्ञांनी असे मत मांडले की पाण्यात नायट्रेटचे प्रमाण वाढल्याने फंगल डिसिज झालेली आहे. तरी मला असे वाटते जवळील शाळेच्या मुलांबाबत असाच काहीसा त्रास वा दुसरा त्रास हा दुषित पाण्यामुळे होत आहे. ग्रामसेवकाकडे या बाबत विचारणा केली असता उत्तर मिळाले की पाण्याचे नमुने गोळा करुन सादर करण्यात आलेले आहेत. त्याचा अहवाल प्रलंबित आहे. आपण गावात कोणालाही प्रश्न विचारल्यास सांगण्यात येईल की पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. फक्त पिण्याच्या पाण्याचाच प्रश्न नाही, तर शेतीच्या पाण्याचाही तोच प्रश्न आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी जे स्पेंट वॉश टाकलेले आहे, त्यामुळे गावात दुर्गंधी पसरलेली आहे. गावात पाहुणा जरी आला, तर आम्हांला लाज वाटते. मी स्वत: वैदकीय क्षेत्रासी निगडीत असल्याने माझ्या असे निदर्शनास येते की प्रकल्प परिसरातील गावात श्वसनाचे आजार वाढलेले आहेत.

बैठकीत स्थानिकांना त्यांच्या प्रदूषणाबाबतच्या तक्रारी उपस्थित केलेल्या आहेत. तरी प्रकल्प बाधित गावांची पाहणी, सर्वेक्षण त्वरित करण्यात यावे. तसेच सादरीकरणात झाडे लावली असे सांगितले, तर किती लावली, कुठली लावली, झाडे लावण्याचे प्रमाण, तसेच किती झाडांचे संवर्धन केले, किती जगली याबाबत कोणालाच माहिती नाही. तरी प्रकल्प बाधित गावात पाहणी करण्यात यावी, नंतरच पुढील निर्णय घेण्यात यावा अशी विनंती.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर देताना सांगितले की सूचना देताना श्री चंद्रकांत चौधरी यांनी २०२२ साली हीच परिस्थिती होती असे सांगितले. २०२२ नंतर कारखान्याने ब-याचप्रमाणात झाडे लावली. २०२२ च्या अगोदरचे कारखान्याचे फोटो व आजचे फोटो यात फरक आहे. येणारे पाहुणे विचारणा करतात की एवढी झाडे कोणी लावली? झाडे लावण्यासाठी जवळजवळ एक कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. २४,००० झाडे लावलेली आहेत. समशेरपूर रस्ता पूर्णपणे ओसाड होता. काही दिवसांनी तेथे जाणारा माणूस हा पूर्णपणे सावलीतूनच जाईल. भविष्यात अजूनही झाडे लावण्यात येणार असून आमचा उद्देशच आहे की

संपूर्ण मैदान हे झाडांनी भरलेले असावे. आसपासचा परिसर हा हिरवागार झाला पाहिजे, लोकांचा त्रास हा कमी झाला पाहिजे.

**५) श्री दिनेश पाटील, राहणार-शिंदेगाव, तालुका व जिल्हा-नंदुरबार:-**

स्थानिक महिला गटांनी अर्ज दिलेला आहे. ते जे छोटे-मोठे उद्योग करतात, त्यांच्या व्यवसायावर प्रकल्पातील राखेमुळे विपरीत परिणाम होत आहे.

येथे **श्री चंद्रकांत चौधरी** यांनी मत मांडले की कारखान्याने झाडे लावली, याबाबत दुमत नाही. मात्र जी राख उत्पन्न होत आहे, त्याबाबत २०२२ पासून अद्यापपावेतो काहीही सुधारणा झालेली नाही. त्याबाबत काय उपाययोजना? तसेच कारखाना व्यवस्थापन स्पेंट वॉश गावातील रस्त्यावर कसा सोडु शकतात.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की स्पेंट वॉश ही कोठेही रस्त्यावर सोडला जात नाही. ज्या शेतक-याची मागणी असेल, त्या शेतक-याला तो उपलब्ध करुन देण्यात येतो. ब-याच शेतक-यांना त्याचे चांगले परिणाम मिळालेले आहेत. प्रकल्पात २८ टनी बॉयलर असून त्यात तो जाळला जातो.

त्यावेळी **श्री चंद्रकांत चौधरी** यांनी आक्षेप नोंदविला की कारखान्याच्या सब स्टेशनच्या बाजूला खड्डे केलेले आहेत. ते स्पेंट वॉशने पूर्णपणे भरलेले आहेत.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की स्पेंट वॉश हा कोठेही बाहेर सोडला जात नाही. प्रकल्पातील स्पेंट वॉश ही ऊसाला, झाडाला वापरण्यात येत आहे. पावसाळ्यात झालेल्या स्थानिकांच्या बैठकीत पावसाच्या पाण्याची विल्हेवाट प्रत्येक शेतक-यालाच लावावी लागेल अशी सूचना कारखाना व्यवस्थापनाने अगोदरच दिलेली होती.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उपस्थितांना पाणी व राखेशिवाय इतर काही प्रश्न असल्यास ते उपस्थित करण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की नविन प्रकल्पात ईएसपी बदलावा लागणार असल्याने आता संक्रातीला दोन दिवस चाळीस लाख खर्च करुन ईएसपी बदलणार असून नविन प्रकल्पात अजूनही त्यात सुधारणा होईल. सुमारे १५० कोटी रुपये खर्च करावे लागणार आहेत. त्यामुळे १००% राख ही बंद होईल.

**६) श्री विठ्ठल मुराद पाटील, राहणार-शिंदेगाव, तालुका व जिल्हा-नंदुरबार,**

माझ्या हातूनसुध्दा सर्व कागदपत्रे दिलेली आहेत. बैठक झाल्यानंतर आपण माझ्यासोबत येण्याची विनंती करतो आणि कोठेकोठे राख आहे, ते दाखवितो. जर त्यामुळे काही सामाजिक आंदोलन झाले व त्यास काही गालबोट लागल्यास, त्यास कारखाना प्रशासन व सरकारी प्रशासन हे जबाबदार राहतील. या महिन्याच्या २० ते २५ तारखेस हे आंदोलन होईलच. हे ४,५०० लोकवस्तीचे गाव असुन सर्वजण आंदोलनात सहभाग घेतील.

तसेच शासनाची हगणदारीमुक्त गाव योजना आहे. मात्र येथे रस्त्यावरुन चालतासुध्दा येत नाही. येथे सर्व रस्ता ऊसतोडणी कामगार उघड्यावर शौच (Open defection) करण्यासाठी वापरत असतात. त्यामुळे शेतात कापूस काढण्यासाठी मजूर येत नाहीत. ब-याच वेळा ही बाब कंपनी प्रशासनास सांगितलेली आहे. या वेळेस त्यांनी संडास उभे केलेच नाहीत.

तसेच या कारखान्याचा येथील पंचक्रोशीला एक रुपयाचा फायदा नाही. कारखाना चाललाच पाहिजे. मात्र प्रदूषण हे थांबलेच पाहिजे. तसेच विनंती आहे की प्रकल्पबाधित गावांना भेट देऊन पाहणी करण्यात यावी.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी आवाहन केले की एकत्रित विषय मांडण्याऐवजी एकएकाने बोलावे.

**७) श्री विपुल चौधरी, राहणार-समशेरपूर,तालुका व जिल्हा-नंदुरबार:-**

प्रस्तावित आसवणी प्रकल्पामुळे परिसरात हवा प्रदूषणाचा काही त्रास होईल काय?

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांना उत्तर देण्याची सूचना केली.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की पर्यावरण व्यवस्थापन योजना कशाप्रकारे राबविण्यात येतील, त्याबाबत तक्त्याव्दारे संपुर्ण माहिती देण्यात येत आहे.

त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की २०२२ मध्ये अशीच जाहिर जनसुनावणी झालेली होती. आता जो बदल करण्यात येणार आहे, तो विस्तारिकरण करतानाच करण्यात येणार आहे. जी जुनी मशिनरी आहे, ती बाद करुन नविन मशिनरी घेण्यात येणार आहे. त्यामुळे मी याठिकाणी ग्वाही देतो की जो काही त्रास आता प्रकल्प परिसरात होत आहे, तो निश्चितच कमी होणार आहे. बैठकीत राखेचा व पाण्याच्याबाबत सूचना विचारण्यात आलेल्या आहेत. तरी दुस-या विषयांवर काही सूचना, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्यात यावेत.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सादरीकरणात दर्शविल्याप्रमाणे प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेसाठी ₹ १०८ कोटी खर्च करणार आहोत. त्यात ईएसपी सयंत्रणा बदलण्याचा विषय आहे.

त्यावेळी श्री मोहनदादा या कारखान्याचे अध्यक्ष होते. त्यावेळी एक कणसुध्दा राख येत नव्हती. कारण राखेचे टेन्डर काढले जायचे. नंतर ती राख शेतक-यांना वाटायचे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की आजही समशेर गावचे श्री दिलीप बंप भील आणि गिरिधर भील हे टेंडर घेतात. रोज साधारणपणे १५-१६ ट्रॅक्टर राख निघत असते. ती राख ही शेतक-यांना मोफत देत असतो.

त्यावेळी उपस्थितांनी ती राख पंखा लावून उडवतात असा आक्षेप नोंदविला. प्रकल्प प्रवर्तक यांनी तो आक्षेप फेटाळून लावला.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की गिरधरभाऊ व दिलीपभाऊ या दोघांची टेंडर आहेत. काही उपस्थितांनी येथे एकत्रित आक्षेप नोंदविण्यास सुरवात केली. त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की या बैठकीचे व्हिडिओ रेकॉर्डींग चालू आहे. आपण उपस्थित केलेले प्रश्न, सूचना, टीकाटिप्पणी यांची नोंद घेण्यात येत आहे. आपल्या प्रत्येक सूचनेची नोंद घेण्यात येत आहे.

**८) श्री सतीश मधुकर चौधरी, राहणार-समशेरपूर, तालुका व जिल्हा-नंदुरबार:-**

या प्रकल्पामुळे स्थानिक लोकांच्या आरोग्यावर काही परिणाम होतील काय? जर होतील, त्याबाबत काय उपाययोजना प्रकल्प प्रवर्तकांनी योजिलेल्या आहेत?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी पर्यावरण व्यवस्थापन योजना (ईएमपी) अंदाजपत्रक दाखवित असे सांगितले की हवा पर्यावरण, पाणी पर्यावरण याचा वेगळा टप्पा केलेला आहे. स्थानिकांना जो काही त्रास होत आहे, त्यावरही अभ्यास करण्यात आलेला आहे. येथे विदयमान भांडवली गुंतवणूकीमध्ये आपणास राखेचा/धुळीचा जो त्रास होत आहे, त्यासाठी अत्याधुनिक असे हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा - ईएसपी (इलेक्ट्रो-स्टॅटिक प्रेसिपरेटर) कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्याची क्षमता ९९.९% एवढी आहे. त्यामुळे राखेचे कण हे खाली बसतील.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांना सांगितले की उपस्थितानी प्रस्तावित प्रकल्पामुळे परिसरातील लोकांच्या आरोग्यावर काही परिणाम होईल काय असा प्रश्न विचारलेला आहे. त्याबाबत उत्तर देण्यात यावे. आपण काय वैदकीय सुविधा उपलब्ध करणार आहात, त्याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी निधितर्गत (CSR Fund) प्रकल्प परिसरातील विविध गावांमध्ये दरवर्षी आरोग्य शिबिर आयोजित करण्यात येईल. तसेच

गावातील लोकांना त्वरित वैदकीय सुविधा उपलब्ध होण्यासाठी एक रुग्णवाहिका (ambulance) उपलब्ध करुन देण्यात येईल.

९) **श्री केदार सुरेश चौधरी, राहणार-समशेरपूर, तालुका व जिल्हा-नंदुरबार:-**

आपण रुग्णवाहिका (ambulance) उपलब्ध करुन देणार आहात. तर स्थानिक व्यक्तीला जोपर्यंत आजार होत नाही, त्याअगोदर आपण कधी रुग्णवाहिका (ambulance) उपलब्ध करणार आहात, त्याची आम्हांला तारीख (target date) सांगण्यात यावी. तरी सादरीकरण अहवालात एक तक्ता/कॉलम टाकून किती तारखेपर्यंत देणार (target date) याची माहिती देण्यात यावी.

तसेच प्रत्येक कामाची, प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेची कधी कार्यान्वित/अंमलबजावणी होणार याची तारीख (target date) आणि माहिती पर्यावरण अहवालात नोंद घेण्यात यावी. कारण प्रकल्प प्रवर्तक यांनी २०२२ साली फक्त आश्वासने दिली, त्याचे काहीही पालन केलेले नाही.

यावेळी प्रकल्प प्रवर्तकाचे कार्यकारी संचालक यांनी उत्तर देताना सांगितले की आपण बैठकीत आपल्या अडचणी उपस्थित केलेल्या आहेत. त्यात मुख्य अडचण आहे राखेची आणि पाण्याची. तरी मी कार्यकारी संचालक या नात्याने ग्वाही देतो की ८-१० दिवसात याबाबत ठोस निर्णय घेण्यात येणार आहे. ईएसपी कार्यान्वित केल्याने या प्रश्नांचे निराकरण होणार आहे.

त्यावेळी काही उपस्थितांनी राख आणि पाणी याबाबत कायमचा तोडगा काढण्याची तारीख सांगण्याची मागणी केली. कारण कारखान्यातून सोडलेले, झिरपलेले पाणी हे आमच्या ट्युब विहिरी, बोअर वेलमध्ये येत असते. ते कधि बंद होईल, तसेच काजळी नियंत्रणाचे काम कधी पुर्ण करण्यात येईल ते सांगण्यात यावे. आपण पीपीटीमध्ये एक कॉलम तयार करुन प्रत्येक बाबींची लक्ष्य तारीख (target date) घालण्यात यावी.

यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की स्थानिकांनी पाण्याचे झिरपणे (water percolation) बाबत आक्षेप नोंदविलेला आहे. तर २०१८-१९ ला येथे मोलॅसिस वाहून गेले होते. त्याचे कदाचित आजपर्यंत झिरपणे (water percolation) होत असेल. आता तो प्रश्न सुटेल. आता प्रश्न राखेचा. तर आता दोन दिवस कारखाना बंद करुन सुधारणा करण्यात येत आहे. नंतरच तो चालू करण्यात येईल. पुढच्या वर्षी ईएसपी बदलण्यात येणार आहे. जसे शेतक-यांचे नुकसान झाले, तसेच कारखान्याचेही तसेच करोडो रुपयांचे नुकसान झालेले आहे. कुठलीही आपत्ती सांगून येत नाही. तापमान वाढल्याने मोलॅसिस वाहून गेले. तरी बैठकीत सांगितलेल्या सर्व सुधारणा करण्यात येणार आहेत. या कारखान्यामुळे येथे ७००-८०० व्यक्तींना रोजगाराची संधि प्राप्त झालेली आहे. कित्येक करोडो रुपयांची उलाढाल झाल्याने शेतक-यांचाही फायदा झाला. आपला एक कारखाना नंदुरबार जिल्ह्यातील ५०% उसाचे गाळप करत आहे. २५,००० शेतकरी सभासद आहेत. ३,०००.० हेक्टर ऊस गाळप करत आहोत. आता ऊस गाळपाचा हंगाम सुरु आहे. कदाचित हंगाम हा दीड महिना चालेल. आपण केलेल्या सर्व सूचनांची अंमलबजावणी करण्यात येईल. पुढच्या हंगामात सर्व सुधारणा झालेल्या असतील.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत सांगितले की सर्व उपस्थितांनी प्रकल्पाविषयी आपल्या सूचना, विचार, आक्षेप नोंदविलेले असून त्याची नोंद घेण्यात आलेली आहे. तीन महत्वाच्या समस्या सांगितल्या – १) चिमणीतून राख उडते, २) जल प्रदुषण आणि ३) प्रस्तावित प्रकल्पाचा आरोग्यावर होणारा संभाव्य परिणाम. याची नोंद व्हिडिओग्राफीमध्येही झालेली आहे. याची बैठकीच्या इतिवृत्तात नोंद घेण्यात येईल. सदरहू इतिवृत्त हे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल. प्रकल्पाबाबत पुढील कार्यवाही म्हणजे मंजूर किंवा नामंजूरी हे केंद्र सरकार करत असते.

श्री केदार चौधरी यांनी मत मांडले की आम्ही येथे राहतो. येथील स्थानिक शेतक-यांनी लक्ष्य दिनांक (target date) ची मागणी केलेली आहे. मी औद्योगिक क्षेत्रात काम केलेले आहे. तेथे लक्ष्य दिनांक (target

date) द्यावीच लागते. तरी पीपीटी मध्ये एक अतिरिक्त कॉलम टाकून लक्ष्य दिनांक (target date) देण्यात यावी.

प्रकल्प प्रवर्तक यांनी येथे उत्तर दिले की आताच अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की जोपर्यंत केंद्र सरकाराची परवानगी मिळत नाही, तोपर्यंत येथे प्रकल्प सुरुच होत नाही. येथे बैठकीत सांगितल्याप्रमाणे आम्ही सर्व सुधारणा करुन त्याचे परत सादरीकरण शासनास दाखविण्यात येईल. तरी उपस्थितांना विनंती आहे की इतर काही सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदवाव्यात.

**१०) श्री उमाकांत माधव पाटील, उपसरपंच,शिंदे ग्रामपंचायत, तालुका व जिल्हा-नंदुरबार यांनी परत सूचना -** करताना सांगितले की शासनाच्या निर्देशनास आमचे सांगणे आहे की राख आणि सांडपाणी (स्पेंटवॉश) जे प्रकल्पातून निघते, जोपर्यंत बंद होत नाही, तोपर्यंत या प्रकल्पाच्या विस्तारिकरणास मान्यता देण्यात येऊ नये. तसेच बॉयलरमधून किती दिवसात राख बंद होईल हे जाहिर करुन त्याबाबतचे लेखी आश्वासन हे स्थानिक/प्रकल्प बाधित ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये सादर करण्यात यावे, तसेच प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी ऊसगाळप हंगामात येथील पर्यावरणाचा अभ्यास/सर्वेक्षण करावे ही आमची शासनास मागणी आहे. शासनाने याबाबत आम्हाला कळवावे. शासनाच्या प्रतिनिधींनी बाधित गावांना भेटी देऊन पाहणी करावी. कंपनीस भेट देण्यास जाऊ नये. प्रदूषणाचा त्रास हा गावक-यांना होत आहे. तरी गावांना भेटी द्याव्यात. तरी याबाबत सर्व लेखीस्वरुपात सर्व ग्रामपंचायत कार्यालयास कळविण्यात यावे.

**११) श्री शांतीलाल गोविंद पटेल, राहणार-समशेरपूर, तालुका व जिल्हा-नंदुरबारः-**

कारखान्याला लागूनच जवळच आमचे गाव आहे. कारखान्याला लागून उत्तरेला भितींलागून माझे शेत आहे. त्यावर माझे, माझ्या कुटुंबियांचे जीवनमान अवलंबून आहे. कारखान्याच्या सांडपाण्याच्या झिरपण्याने माझे ट्युब विहिर पाणी खराब झालेले आहे. सदरहू बाब कंपनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. ब-याच वेळा रस्त्यावर कंपनीतील पाणी येते, आम्ही त्यांना बंद करण्यास सांगतो. रस्त्यावर सांडपाणी येते, आम्हांला शेतात जायला त्रास होतो.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की स्थानिकांनी कोणीही सूचना केली, तर आम्ही ती निश्चितच पाळत असतो. सर्वांनाच सहकार्य करत असतो.

**१२) श्री लिंबाजी सुरेश भड, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-**

सर्वांचे तेच तेच प्रश्न आहेत, जल प्रदूषण, हवा प्रदूषण आणि आरोग्यविषयक. याशिवाय इतर मुद्दे असल्यास ते उपस्थित करण्यात यावेत. फक्त एकाच व्यक्तीने बोलावे. फक्त पर्यावरणविषयकच सूचना, आक्षेप नोंदविण्यात यावेत.

**१३) श्री रमेश हिलाल माळी, राहणार-शिंदेगाव, तालुका व जिल्हा-नंदुरबारः-**

पालघर जिल्ह्यात डहाणू तालुक्यात वीट भट्टीमुळे राखेचा त्रास होत होता. १९९२-९६ च्या काळातील ही घटना असून त्यावर सर्वानुमते तोडगा काढण्यात आलेला होता. त्या निष्कर्षाचा येथे काही उपयोग होत असल्यास त्याबाबत निश्चितच विचार करण्यात यावा.

**१४) श्री गोविंद दगडू चौधरी, राहणार-समशेरपूर, तालुका व जिल्हा-नंदुरबार:-**

या विस्तारिकरण प्रकल्पामुळे समशेरपूर गावाला काही फायदा होईल काय?

समशेरपूर, शिंदे गाव व इतर गावांतील बरेच रहिवाशी यांना प्रकल्पात रोजगाराची संधि प्राप्त झालेली आहे. विस्तारिकरण प्रकल्पात जे अतिरिक्त मनुष्यबळ लागेल, त्यात स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येणार आहे. तसेच स्थानिकांना मिळणा-या कामात (contract) अजून वाढ होईल.

**१५) श्री अशोक रतिलाल पाटील, राहणार- कोरीट, तालुका व जिल्हा-नंदुरबार:-**

या प्रकल्पामुळे आजूबाजूच्या गावांना काही फायदा होईल काय?

प्रकल्पाच्या किंमतीचा काही भाग हा सीईआर साठी खर्च करावाच लागतो. गावातील सामाजिक योजनांसाठी ती खर्च करावीच लागते. त्याचा फायदा हा प्रकल्प परिसरातील गावांना निश्चितच होईल. बैठकीत शेतक-यांच्या सूचना होत्या जसे की राख मोफत उपलब्ध करण्यात येते.. समशेरपूरच्या राख उचलणा-या कंत्राटदारास आम्ही सांगतो की जवळच्या शेतात नेऊन टाक. तसेच शेतक-यांनी प्रेसमडचा फायदा घेतला पाहिजे, प्रकल्प प्रवर्तक कमीतकमी दरात स्थानिक शेतक-यांना प्रेस मड उपलब्ध करुन देण्यात येते.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की उपस्थित केलेल्या सर्व सूचना, विचार, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे. ब-याच उपस्थितांनी पाण्याचे प्रदूषण, राखेचे प्रदूषण, आरोग्यविषयक सुचना शिवाय आता प्रेसमडबाबत सूचना उपस्थित केलेल्या आहेत. याव्यतिरिक्त कोणालाही इतर विषयांवर काही सूचना, टीकाटिप्पणी असल्यास ते उपस्थित करण्यात यावेत. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

त्यावेळी काही उपस्थितांनी राखेबाबत, पाण्याच्या प्रदूषणाबाबत प्रकल्प प्रवर्तक यांनी लेखीस्वरुपात आश्वासन देण्याची मागणी केली. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित केलेल्या सर्व सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे. सदरहू इतिवृत्त अध्यक्षांच्या परवानगीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ञ समिती यावर पुढील निर्णय घेते.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले आणि मा. अध्यक्षांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

सदर पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी दरम्यान प्राप्त झालेल्या एकूण ०५ लेखी सूचना/आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

Pakhale

( प्रणव पाखले )
समन्वयक तथा उप्राअ
मप्रनि मं. धुळे

( लिंबाजी सुरेश भड)
सदस्य तथा प्रा.अ.
मप्रनि मं. नाशिक

( धनंजय गोगटे)
अध्यक्ष
अपर जिल्हाधिकारी, तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, नंदुरबार